


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : ८०१ वा गुरुवार दि. १३ जून २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# राष्ट्रीय आरोग्य मिशन विभाग की राष्ट्रीय गोंधळ मिशन...

## अनागोंदीची परिसीमा आणि लपवाछपवीचाच कार्यक्रम...

**जनसंचलन/बुलढाणा**


सर्वसामान्य नागरिकांना चांगले आरोग्य प्राप्तव्हावे, यासाठी २००५ साली केंद्र शासनाच्या वतीने राष्ट्रीय आरोग्य मिशनची सुरवात केली. मात्र, आज या अभियानाची अवस्था पाहिली तर हे राष्ट्रीय आरोग्य मिशन नव्हे तर राष्ट्रीय गोंधळ मिशन बनल्याचे दिसून येत आहे. कारण या मिशनअंतर्गत होणाऱ्या कामांमध्ये नेमके काय सुरू आहे, हे कुणालाही कळत नाही. एव्हढी गुप्तता कशासाठी बाळगगली जाते, हे अद्यापही न उलगडलेलं कोडं आहे.येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात सध्या राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत एका भव्यदिव्य इमारतीचे बांधकाम सुरू आहे. मात्र,अत्यंत निकृष्ट व नियमबाह्य अशा पद्धतीने होत असलेल्या या रुग्णालयातील काही अधिकाऱ्यांना माहिती नसणे ही खरे तर खूपच धक्कादायक बाब आहे. त्यावर हे काम राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत होत असून, त्या विभागाचे अधिकारी आम्हाला माहिती देत नसल्याचे स्पष्टीकरण रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी दिली. या नंतर सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने राष्ट्रीय आरोग्य मिशनच्या अधिकाऱ्यांकडे याबाबत विचारणा केली, त्या वेळी या मिशनच्या अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास अक्षम्य टाळाटाळ केली. राष्ट्रीय आरोग्य मिशनचे जे जिल्ह्याचे प्रमुख आहेत, ते कधीही रुग्णालयात सुरू असलेल्या बांधकामावर भेटत नाहीत. पत्रकारांना कोणतीही माहिती दिली जात नाही. यावरून हे स्पष्ट आहे की,

**पोस्टमार्टम १०२**

या बांधकामात नक्कीच काहीतरी काळबेर झालेलं आहे. राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत बांधण्यात येत असलेली ही इमारत बीएमसी अंतर्गत सुरू आहे. मात्र, विभागाच्या कामकाजाबाबत तर न बोललेलंच बरं. असेच सार्वजनिक (विद्युत विभाग ) बुलडाणा यांना जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या बैठकीत लाखो रुपये खर्च करून एक आरओ प्लांट बसवण्यास त्वरित मंजुरी दिली. सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभागाच्या) नालायक आणि ढिसाळ अधिकारी उप अभियंता गौरकर हा आरओ प्लांट बसवण्यास तब्बल चार ते पाच ते महिने चालढकल केली. या दरम्यान उन्हाळा आला. रुग्णालयात येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना पाण्यासाठी अक्षरशः वणवण हिंडावे लागले. परंतु सार्वजनिक बांधकाम ( विद्युत ) विभागाच्या निर्लज्ज अधिकाऱ्यांना कशाचीही लाज वाटली नाही आणि त्यांनी हे काम पूर्ण केले नाही. आत्ता अशी माहिती आहे की, काही दिवसांपूर्वी म्हणजे पावसाळा लागल्यानंतर हे काम सुरू झालेले आहे. यावरून जिल्हा सामान्य रुग्णालायप्रमाणेच सा. बां.

**नियमबाह्य सुरू असलेल्या कामांचा पूर्ण छडा लावून त्याचा उलगडा करून प्रशासनाला आम्ही जागे करू व संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकत नाही आमचा हा लढा असाच सुरू राहणार**

( विद्युत ) विभागाच्या अधिकाऱ्यांनीही आपला नालायकपणा व अनागोंदी कारभार उजागर केला. एका साधा आरओ प्लांट बसवण्यासाठी सा. बां. विद्युत विभाग एव्हढा ढिसाळपणा करू शकतो, तर मग एखादी मोठी इमारत बांधण्यात नॅशनल हेल्थ मिशन विभाग किती भ्रष्टाचार, ढिसाळपणा करू शकतो, याची कल्पनाच न केलेली बरी. ज्या कामात भ्रष्टाचार झालेला असतो, त्याची माहिती दडवण्याचा संबंधित अधिकारी आटोकाट प्रयत्न करीत असतात. हाच न्याय लावायचा झाला, तर या निकृष्ट दर्जेच्या बांधकामात प्रचंड घोटाळा झालेला आहे, असे म्हणण्यास नक्कीच वाव आहे. जिल्हा रुग्णालय असो, राष्ट्रीय आरोग्य मिशन असो की, सार्वजनिक बांधकामचे इतर विभाग सारेच विभाग अत्यंत भ्रष्ट, ढिसाळ आणि निर्लज्ज झालेले आहे. कुणाचेही कुणावर नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. कुठलेही टार्गेट घेऊन काम करणे नाही, जे काम करायचे ते उत्कृष्ट दर्जाचे नाही, कामाची कोणतीही नियम वेळ पाळायची नाही, कसल्याही जबाबदारीचे भान नाही, अशी स्थिती या तिन्ही विभागांची झालेली आहे. या प्रकारामुळे सगळीकडे गोंधळात गोंधळ झालेला दिसून येत आहे.




या तिन्ही विभागांचे वरिष्ठ अधिकारी एकतर कुंभकर्णी झोपेत आहेत किंवा ते या समस्यांकडे जाणुनबुजून दुर्लक्ष करीत आहेत.आपण सारे भाऊ सर्व काही मिळून खाऊ म्हणजेच या तिन्ही विभागांच्या अधिकाऱ्यांनी बेशरमपणाचे पांघरुण घेतले आहे. कमीत कमी आता जिल्हाधिकारी महोदयांनी या प्रकरणात लक्ष घालणे गरजेचे आहे. कारण त्यांच्याकडून या प्रकरणात काहीतरी सकारात्मक होण्याची जिल्हावासीयांची अपेक्षा आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन आपली जबाबदारी निभावत आहे. भ्रष्टाचाराचा छडा लावून भंडाफोड करीत आहे. परंतु प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही सुरू असलेल्या सर्व कामांचा भ्रष्ट अधिकाऱ्यांचा आढावा घ्यावा दोषींवर कडक कारवाई करावी

अजून बरेच काही पुढील भागात...

# मंत्रीपद स्वीकारल्यानंतर ना.जाधव प्रथमच आज जिल्ह्यात, गजानन महाराजांचे घेणार दर्शन

**जनसंचलन/ शेगाव**

केंद्रीय राज्यमंत्रिपदाची शपथ व पदभार घेतल्यानंतर आयुष (स्वतंत्र प्रभार) आणि आरोग्य व कुटंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे १३ जून रोजी स्व जिल्ह्यात प्रथमच दाखल होत आहे. सकाळी शेगावमध्ये त्यांचे प्रथमतः आगमन होईल. संत श्री गजानन महाराजांच्या समाधीचे ते प्रथमतः दर्शन घेतील. त्यानंतर आषाढी वारीसाठी मार्गस्थ होणाऱ्या संत गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्यात ते सहभागी होणार आहेत. या सोहळ्यानंतर शासकीय विश्रामगृहावर ते सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत थांबणार आहेत. त्यानंतर तेथून ते खामगाव येथे रवाना होणार आहेत. खामगाव येथे ते लोकनेते स्व. भाऊसाहेब फुंडकर यांच्या खामगाव येथील समाधिस्थळी जाऊन ते दर्शन घेतील. सोबतच आमदार ॲड. आकाश फुंडकर यांच्या निवासस्थानी ते सदिच्छा भेट देणार असून तेथे छोटेखानी कार्यक्रमात त्याचा सत्कार करण्यात येणार आहे. यानंतर खामगावातील शासकीय विश्रामगृहावर सकाळी ११ ते दुपारी दोन वाजेपर्यंत ते थांबणार असून येथे ते कार्यकर्त्यांच्या भेटी घेणार आहेत. दुपारी दोन वाजेनंतर ते खामगावातून ते मेहकर येथे जाणार आहेत. दरम्यान केंद्रीय राज्यमंत्रिपदाची शपथ



व पदभार घेतल्यानंतर प्रथमच जिल्ह्यात व आपल्या निवासस्थानी ते येत आहे. त्यानुषंगाने शेगाव, खामगाव आणि मेहकर येथे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांकडून त्यांचा विविध ठिकाणी सत्कारही होणार आहे. दरम्यान दुसऱ्या दिवशी ते पुन्हा दिल्ली येथे जाणार आहेत.

# पडताळणी होईपर्यंत प्रवेश प्रक्रिया रद्द करण्यात यावी- कोमल तायडे

**जनसंचलन/बुलढाणा**

सन २०२३-२४ मध्ये झालेल्या निट्च्या परीक्षेत अनेक विद्यार्थ्यांचे गुण बाद झाल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये परीक्षेबाबत एक प्रकारचा संभ्रम निर्माण झाला आहे.या चाचणीत काही चूक आहे का? अशी शंका निर्माण झाल्यास या चाचणीचा योग्य तपास करणे आवश्यक आहे का? त्यामुळे बुधवार दिनांक १२/०६/२०२४ रोजी उपविभागीय अधिकारी महसूल, मलकापूर शहर यांच्या मार्फत परीक्षा घेणाऱ्या मंडळाला कोमल सचिन तायडे व अमोल पाटील सर यांच्या नेतृत्वाखाली



अनेक विद्यार्थ्यांनी निवेदन दिले आहे. एनईईटी परीक्षार्थींवर झालेल्या अन्यायाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी व याबाबत नवीन शासन धोरण तयार करण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या वेळी विद्यार्थी व शिक्षक वृंद हजर झाले होते

# आज श्रींच्या पालखीचे पंढरपूरसाठी प्रस्थान

## ७०० वारकऱ्यांचा सहभाग वारीचे ५५ वे वर्ष



**जनसंचलन/ शेगाव**

आषाढी वारीसाठी भाविकांना विठुरायाच्या पंढरीची ओढ लागली आहे. त्यामुळे भाविक पायदळ वारीसाठी सज्ज झाले असून १३ जून रोजी श्री गजानन महाराज संस्थानच्या पालखीचे ब्राम्हवृंदानच्या हस्ते विधिवत पूजन करून श्रींच्या सेवधारी व्यवस्थापकीय विश्वस्थांच्या उपस्थितीत सकाळी ७ वाजता विठुरायाच्या दर्शनासाठी प्रस्थान होणार आहे. गण गण गणात बोते.. जय गजानन श्री गजानन.. विविध अभंगांच्या निनादात श्रींची पालखी भक्तिमय वातावरणात पंढरपूर कडे मार्गस्थ होत आहे. श्रींचा नामघोष करीत अभंगांच्या तालावर ठेका धरून भाविक पालखीत तल्लीन होतात. पालखीचे यंदा ५५ वे वर्ष असून ३३ सतत प्रवास करून श्रींची पालखी पंढरीत दाखल होणार आहे. १७ जुलै रोजी आषाढी एकादशी सोहळा आटोपून पालखीचा परतीचा प्रवास राहणार आहे. श्री क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी संपूर्ण भारत भरातून लाखो वारकरी भाविक आषाढी एकादशीच्या सोहळ्यात सहभागी होतात. श्रींच्या पालखीत पायदळ वारी करीत पंढरपूर जाऊ न शकणारे भाविक भक्त आषाढी एकादशीला विदर्भ पंढरी असलेल्या संतनगरीत श्री गजानन महाराजांचे दर्शन घेतात. तर दरवर्षी पंढरपूर जातांना श्रींच्या पालखी सोबत हजारो भाविक श्रीक्षेत्र नागझरी पर्यंत पायदळ वारी करतात. तसेच श्रींच्या पालखी सोबत दोन रुग्णवाहिका, तीन मालट्रक, तीनअश्व, एक प्रवासी बस यासह वैद्यकीय पथक,पाण्याची व्यवस्था यासह इतरही व्यवस्था श्री संस्थान कडून उपलब्ध राहतात. उद्या १३ जून रोजी पालखीचे संतनगरीतून प्रस्थान होत आहे. तर १५ जुलै रोजी पालखी विठुरायाच्या पंढरीत पोहचणार आहे. १७ जुलै रोजी आषाढी एकादशी सोहळा आटोपून पाच दिवसांच्या मुक्काम नंतर पालखी परतीच्या प्रवासाला लागणार आहे. २२ दिवसांचा पायदळ प्रवास करीत ११ ऑगस्ट रोजी पालखी स्वगृही संतनगरीत पोहचणार आहे.

# खरीप व रब्बी हंगामातील पिक विमा मोबदला पंधरा दिवसात द्या

## अन्यथा तिव्र आंदोलन करणार- कैलास नारायण मेहेत्रे...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

मागील वर्षीचा शेतकऱ्यांचा पिक विमा खरीप व रब्बी हंगामातील अद्याप प्रयत्न मिळाला नसल्याने १० जुन रोजी जिल्हा कृषी अधीक्षक बुलढाणा यांना तालुका कृषी अधिकारी यांच्यामार्फत सामाजिक कार्यकर्ते कैलास मेहेत्रे यांनी निवेदन देऊन पंधरा दिवसात पिक विमा द्या अन्यथा तिव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे तालुक्यातील शेतकऱ्यांनी घरच्या लक्ष्मी च्या अंगावरील सौभाग्याच लेण मोडून पिक कर्ज काढून, उसणवारी, व्याज-व्यवहारी करून, मुला-बाळांचे लग्न सामाजीक संस्कृतीक कार्यक्रम बाजूला सारून पुढील हंगामात आपले पिक चांगले येईल व आमची सर्व इच्छा अकांक्षा पुर्ण होतील आमच्याही जिवनात सुख, समृध्दी येईल या अपेक्षेने आम्ही शेतकरी जिवाची बाजी लावून मागील खरीप हंगामात शेतात पिकांची पेरणी केली. वाढती मजूरी, कृषी निविष्टांचे वाढलेले भाव, नैसर्गीक आपत्ती व हंगामात येणाऱ्या विविध अडचणींवर मात करून या वर्षी पिकले नाही पुढच्या वर्षी भरपुर पिकेल या आशेवर आम्ही शेतकरी शेतात पिकांची पेरणी करीत असतो व भविष्याची वाट काढत असतो. मागील हंगामात खरीप व रब्बी ला तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभाग घेतला होता. संपुर्ण खरीप हंगाम कोरडा जाऊन महीनो महीने पावसाचा खंड पडला होता. त्यातच वन्य प्राणी नुकसान, गोगल गाय (हुमणी अळी), कधी वादळी वारा-तर कधी अवकाळी पाऊस यामुळी तालुक्यातील शेतकऱ्यांचे खरीप व रब्बी हंगामात पिंकांचे आतोनात नुकसान झाले व त्या-त्या नैसर्गीक आपत्तीत पिक विमा योजनेत भाग घेतलेल्या शेतकऱ्यांनी वेळेत पिकविमा कंपनीकडे तक्रार नोंदविल्या होत्या. मागील खरीप व रब्बी हंगाम




होऊन पुढील खरीप हंगामात पेरणी सुरू झाली आहे. तरीही अजून या तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचा लाभ मिळाला नाही. त्यासाठी आम्ही शासनाकडे विविध मोर्चे, निवेदने, आंदोलने केली परंतु अजूनही पिक विमा योजनेचा लाभ मिळाला नाही.-उपरोक्त विषयान्वये आम्ही आपणास निवेदनाव्दारे कळवितों की, येत्या १५ दिवसाच्या आत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामातील पिक विम्याचा लाभ मिळाला नाही तर आम्हाला तिव्र आंदोलन व उपोषणासारखे मार्ग अवलंबवावे लागेल व होणाऱ्या परिणामास तालुका कृषि अधिकारीन व प्रशासन जबाबदार राहील.

# इलेक्ट्रीक दुचाकीच्या बॅटरीचा चार्जींग करतांना स्फोट होऊन दोघे जखमी...

**जनसंचलन/मलकापूर**

इलेक्ट्रीक दुचाकीच्या चार्जींग बॅटरीचा स्फोट झाल्याने बाप-लेकं जखमी झाल्याची घटना शहरातील पद्मालय अपार्टमेंटमध्ये घडली असून या स्फोटाने या परिवारासह परिसरात एकच खळबळ उडाली होती. सदर घटना १० जून रोजी रात्री घडली. याबाबत माहिती अशी की, येथील पद्मश्री व्ही. भी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यरत महाविद्यालयातील प्राचार्य विशाल सुभाषराव वैद्य हे पद्मालय अपार्टमेंटमध्ये राहतात. सोमवारी मध्यरात्री १२.३० वा. च्या सुमारास त्यांच्या इलेक्ट्रीक दुचाकीची बॅटरी चार्जंगला लावली असतांना तिचा अचानक स्फोट झाला. यामुळे बॅटरीतील ॲसीड हे विशाल वैद्य व त्यांचा मुलगा अथर्व वैद्य याच्या अंगावर उडाले. सुदैवाने त्यांची पत्नी व मुलगी यांना कुठलीही दुखापत झाली नाही. दरम्यान अचानक झालेल्या या स्फोटाने वैद्य परिवार घाबरून जात त्यांनी आरडा- ओरडा सुरू केला. त्यांचा आवाज ऐकताच अपार्टमेंटमधील शेजाऱ्यांनी तात्काळ त्यांच्या घरीधाव घेत जखमी विशाल वैद्य व त्यांच्या मुलाला प्राथमिक उपचारासाठी रूग्णालयात नेले. यात अथर्वच्या अंगावर व हातावर ॲसीड उडाल्याने छाले आले आहेत.इलेक्ट्रीक दुचाकी पेटण्याच्या अनेक घटना कानावर आल्या असून राहत्या घरात चार्जंगला लावली असतांना बॅटरी पेटल्याची ही घटना घडल्याने चार्जींगचे वाहन वापरणाऱ्यांनी खबरदारी घेणे गरजेचे आहे.

# वरवट बकाल येथे घरासमोरील दुचाकी लंपास



**जनसंचलन/ वरवट बकाल**

येथील प्रल्हाद पांडुरंग अस्वार यांच्या मालकीची एमएच २८ एआर ९२२७ क्रमांकाची दुचाकी ९ जून रोजी रात्री चोरी गेल्याची घटना घडली. दुचाकी मालक प्रल्हाद अस्वार बाहेरगावावरून दुचाकी चालवत ९ रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास घरी परत आले. घरासमोर नेहमीप्रमाणे दुचाकी उभी केली. १० जून रोजी सकाळी घरासमोर रात्री उभी केलेली दुचाकी निदर्शनास पडली नाही. दुचाकीचा शोध घेतला; मात्र दुचाकी कुठेही आढळून आली नाही. या घटनेबाबत दुचाकीमालक प्रल्हाद अस्वार यांच्या फिर्यादीवरून तामगाव पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वरवट बकाल बिट जमादार प्रमोद मुळे करीत आहेत.

# बांधकाम साहित्याच्या वादातून तुफान हाणामारी

**जनसंचलन/ खामगाव**

रस्त्यामध्ये पडलेल्या बांधकाम साहित्यामुळे दोन कुटुंबात वादातून हाणामारी झाली. ही घटना तालुक्यातील चितोडा अंबिकापूर येथे रविवारी घडली. याप्रकरणी परस्परविरोधी तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिसांनी दोन्ही गटातील आठजणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पहिल्या तक्रारीनुसार, गावातील नीलेश गजानन वडतकार यांच्या घराचे बांधकाम सुरू असल्याने रस्त्यावर बांधकाम साहित्य पडले आहे. साहित्यावरून रविवारी सुरेखा रामेश्वर नागे यांनी नीलेश व त्यांच्या भावाला शिवीगाळ केली. त्यावरून वाद विकोपाला गेल्याने सुरेखा रामेश्वर नागे, रामेश्वर पुंडलिक नागे, संजय पुंडलिक नागे, अक्षय संजय नागे, एकनाथ पुंडलिक नागे यांनी संगनमत करून नीलेश व त्यांच्या भावाला मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत केला. दरम्यान देवकाबाई पुंडलिक



नागे यांनी तक्रार दिली. त्यानुसार दत्ता गजानन वडतकार, नीलेश गजानन वडतकार, लक्ष्मी दत्ता वडतकार यांनी संगनमत करून नालीतील कचऱ्याच्या वादातून मारहाणाची आरोप आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी सतर्क राहा-राजेश कायंदे

**जनसंचलन/ चांडोळ**

पावसाळ्यात पाऊस व वादळी वाऱ्यामुळे वीज यंत्रणेला मोठा फटका बसत असत-ो. विजेच्यातारातुटणे, विजेचे खांब कोसळणे, रोहित्र कोसळणे त्याचबरोबर करंट उतरणे अशा घटना घडत असतात. त्यामुळे काही प्रसंगी दुर्घटनाही घडतात. त्यामुळे पावसाळ्यात होणारे संभाव्य विद्युत अपघात टाळण्यासाठी सुरक्षिततेचे सर्व नियम पाळण्याचे व खबरदारी हीच सुरक्षा असते. बुलढाणा तालुक्यातील धाड परिसरात महावितरणकडून दरवर्षी प्रमाणे ३३ केव्ही, धाड सबस्टेशन, धामणगाव धाड, सोयगाव, रायपुर, चांडोळसह ज्या - ज्या ठिकाणी मेन लाईनीच्या तारा झाडांच्या फांद्यामध्ये होती. अशा फांद्यांची काटकटाई करण्यात आली. ज्या ठिकाणी लाईनचे तारे लोमकळत होती त्यांनाही व्यवस्थीत करण्यात आले आहे. तरीही शेतकऱ्यांनी, नागरीकांनी ज्याठिकाणी झाडांच्या फांद्यांमध्ये विद्युत लाईनीचे तारा आढळल्यास तसेच तार लोमकळत असेल याची माहिती जवळच्या सबस्टेशनला किंवा कर्मचाऱ्याला संपर्क साधावा. एकतर पाऊसाळ्याचे दिवस आहेत. पावसात शेतीपंप चालु बंद करणे शक्यतोवर टाळावे, शेतीपंप, शेतीपूरक विजेवरील यंत्रे चालु-बंद करतांना हात कोरडे असावे. रबरी हातमोजे व गमबुट वापर करावा. विद्युत यंत्रणेतील वीज खांब, वीज तारा, रोहित्र पासुन सुरक्षित अंतर राखावे. पावसाळ्यात त्यांना स्पर्श करणे टाळावे. वादळी वाऱ्याने विद्युत खांब कोसळून लाइनचे तार जमिनीवर कोसळतात तेंव्हा गा-वात किंवा शेतशिवारात वापरतांना काळजी घ्यावी. शेतकऱ्यांनी शेता-तील वीजवाहिन्याखाली वीजेच्या खांबाला, खांबाच्या ताणाला गुरु-ढोरे बांधु नये. विद्युत ताराखाली गोठयाची उभारणी करु नये. असे अवाहान धाड विद्युत वितरणकंपनीचे उपकार्यकारी अभियंता राजेश कायंदे यांनी शेतकऱ्यांसह, नागरीकांना केले आहे.

# बाबासाहेब धाबेकर सहकारी सूत गिरणी यांनी केली १ कोटी ५४ लाख रुपयांनी फसवणूक...

## सूत गिरणीवर त्वरित शासन कारवाई करण्याची मागणी

**जनसंचलन/चिखली**

बाबासाहेब धाबेकर सहकारी सूत गिरणी मर्या, अकोला (कारंजा लाड) जि. वाशिम यांनी चक्क १ कोटी ५४ लाख रुपयांनी फसवणूक केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तक्रारकरते सौ दीपा अग्रवाल, अनुप अग्रवाल,गोविंद अग्रवाल यांनी सूतगिरणी विरोधात वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य नागपूर मा आयुक्त यांच्याकडे केली आहे. सविस्तर वृत्त असे की शेतकऱ्याकडून कापूस खरेदी करण्याचा व त्यावर प्रक्रिया करून रुही सूतगिरणीला पाठविण्याचा उद्योग चिखली औद्योगिक क्षेत्रात तिरुपती जिनिंग अँड ऍग्रो इंडस्ट्रीज सुरू असून मागील दहा वर्षापासून सुरळीत सुरू आहे. शेतकऱ्याकडून कापूस खरेदी करून त्या कापसावर प्रक्रिया करून रुई सूतगिरणीला पाठविण्यात येते सदर प्रक्रियेला पंधरा दिवस लागतात व पंधरा दिवसांनी शेतकऱ्यांना पेमेंट करावे लागते सदर व्यवहार हा करोडो रुपयांचा होतो शेतकऱ्यांचा विश्व-ास असतो व आम्ही दलालामार्फत सूतगिरणीला रुई देत असत-ो मागील दहा वर्षापासून हा व्यवहार सुरू होता असे असताना कारंजा लाड येथील बाबासाहेब धाबेकर सूतगिरणीने आमच्याकडून दलालामार्फत रोही बोलवून तसेच सदर रोहीपासून बनलेला धागा आम्हास विक्री करण्याचा दलालामार्फत सौदा करून धागेचे पेमेंट बोलून रुपये १ कोटी ५४ लाख रुपयांची रोही घटने व नदी आरटीजीएस द्वारे पेमेंट पाठवले मात्र आजपर्यंत धागा तयार करून दिला नाही. शेतकऱ्याचा कापूस खरेदी करून त्यावर प्रक्रिया करून रुई सूतगिरणीला विक्री करून धागा परत विकत घेऊन त्याचे पूर्ण पेमेंट सूट गिरणीने घेऊन सुद्धा आजपर्यंत व्यवहार क्लिअर केलेला नाही त्यामुळे त्यांच्याकडे रुपये १ कोटी ५४ लाख रुपये बाकी आहेत त्यामुळे शेतकऱ्याचे देणे असलेले कापसाचे पुढील पैसे आम्ही देऊ शकत नाही त्यामुळे पुढे अनर्थ घडू नये व सदर सुतगिरणीला व्यवहार क्लिअर करण्याबाबत ताकीद द्यावी व त्यांच्यावर शासकीय कारवाई करण्यात येईल असे तक्रारीत म्हटले आहे शेतकऱ्यांसाठी त्यांचे पेमेंट देणे हे अत्यंत आवश्यक असून पेरणीचे दिवस येऊन ठेपले आहे तरी त्वरित चौकशी होऊन शासन कारवाई करण्यात यावी.

# कार घेण्यासाठी सासरच्या मंडळीने केला विवाहितेचा छळ



**जनसंचलन/मोताळा**

कार घेण्यासाठी पाच लाख रुपये घेऊन ये असे म्हणत एका ३६ वर्षीय विवाहितेचा छळ करण्यात आल्याची घटना २३ मे २०१८ ते ७ मार्च २०२४ दरम्यान खरबडी येथे घडली आहे. प्रकरणी विवाहितेच्या फिर्यादीवरून सासरच्या सात जणांविरुद्ध बोराखेडी पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील खरबडी येथील रहिवासी सध्या मोताळा येथे वास्तव्यास असलेल्या एका ३६ वर्षीय विवाहितेने बोराखेडी पो-लीसात फिर्याद दिली. त्यात म्हंटले आहे की २३ मे २०१८ ते ७ मार्च २०२४ दरम्यान खरबडी येथील फिर्यादीचे पती नामदेव जगदेव वाकोडे यानी कार घेण्यासाठी पाच लाख रुपये माहेरून घेऊन ये असे म्हणत फिर्यादीस वेळोवेळी मारहाण करून शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. सोबतच शारीरिक व मानसीक छळ केला आहे तर जगदेव सुखदेव वाकोडे, कुसुम जगदेव वाकोडे, प्रकाश जगदेव वाकोडे, प्रतिभा प्रकाश वाकोडे (सर्व रा. खरबडी) आणी खामगावातील तालुक्यातील उन्ना येथील नातेकीकांनीही चिथावणी दिल्याचे तक्रारीत म्हंटले आहे. प्रकरणी पोलिसांनी उपरोक्त सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# सुरक्षा रक्षकांची कागदोपत्री ड्युटी दाखवून ३१ लाख हडपले

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १६ जणांविरोधात गुन्हा दाखल

**जनसंचलन/ खामगाव**

सम्यक साक्षी सेक्युरिटी अँन्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर च्या सुरक्षारक्षकांची कृषी उत्पन्न बाजार समितीत कागदोपत्री ड्युटी दाखवून वेतनापोटी काढलेले ३१ लाख ६७ हजार रुपये हडप केले. अशी तक्रार सदर सम्यक साक्षी सेक्युरिटी अँन्ड लेबर कंस्ट्रक्शन संचालकांनी स्थानिक शहर पोस्टेला दिली. त्यामुळे पोलिसांनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती, सचिव, कर्मचारी व संचालक अशा १६ जणांविरुद्ध फसवणुकी सह विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहे. ही कारवाई खामगाव शहर पोलिसांनी १० जूनच्या रात्री केली आहे. खामगाव कृषी उत्पन्न बाजार कुउबास सभापती, सचिव, संचालकांसह १६ जणांवर गुन्हा समिती ही विदर्भातील कृषी उत्पन्न बाजार समिती पैकी एक मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती म्हणून गणली जाते. या कृषी उत्पन्न बाजार समितीत मोठ्या प्रमाणात शेतमालाची आवक असल्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये खासगी सुरक्षा तैनात करण्यात आ-लेली असते. त्यामुळे सम्यक साक्षी सेक्युरिटी अँन्ड लेबर कंट्रक्शन चे राहुल बुद्धम अबगड वय ४५ यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव यांनी दिलेल्या आदेशानु-सार २०१९ ते २०२३ दरम्यान सुरक्षा पुरविली होती. या सुरक्षेच्या पोटी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून धनादे-शाद्वारे वेतनही अदा




करण्यात येत होते. परंतु वेतन कायदा तरतुदीप्रमाणे सुधारित वेतनाच्या फरकाची रक्कम कृषी उत्पन्न बाजार समितीकडे बाकी होती ही रक्कम काढून देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती सुभाष पेसोडे, संचालक गणेश संभाजी माने, गणेश मनोहर ताठे, श्रीकृष्ण टिकार, विलास सिंग इंगळे, प्रमोद शामराव चिंचोलकर संजय झुनझुनवाला, मंगेश इंगळे सचिन नामदेव वानखेडे, हिंमत रामा कोकरे सौ सुलोचना श्रीकांत वानखडे, सौ वैशाली दिलीप मुजुमले, सचिव गजानन आमले, कर्मचारी प्रशांत जाधव विजय इंगळे, गिरीश सातव अशा सर्व संचालक काही कर्मचारी आणि सचिव यांनी संगणमत करून आमिष दाखवत त दबाव तंत्राचा वापर करून २१ जून २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत वाढीव दहा सुरक्षा रक्षक याप्रमाणे ३० सुरक्षारक्षकांची ड्युटी कागदोपत्री दाखविण्यास भाग पाडले व त्यांनी खोटी दस-तऐवज तयार करून कागदोपत्री दाखविलेल्या सुरक्षारक्षकांच्या ड्युटीच्या वेतनापोटीचे ३१ लाख ६७ हजार ५१० रुपये हडपले अशी तक्रार राहुल अवघड यांनी खामगाव शहर पोस्टेला दिली त्यामुळे खामगाव शहर पोलिसांनी उपरोक्त १६ आरोपींविरुद्ध कलम ४०९ ४२० ४७७ ३४ भाद-वीचे गुन्हे दाखल केले आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# उद्योग क्षेत्रात महाराष्ट्राचे पुढचे पाऊल, जर्मनच्या बाडेन-वुटेनबर्ग सोबत राज्याचा करार...

**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्र आणि जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग या राज्यात यांच्यात उद्योग क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ पुरवण्याकरिता झालेला करार हा मानव संसाधन विकास क्षेत्रातील मैलाचा दगड ठरणार आहे. या करारामुळे दोन्ही राज्यांच्या आर्थिक विकासाला हातभार लागणार असून भविष्यातील विविध क्षेत्रातील सहकार्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी व्यक्त केला. युरोपीयन देशांच्या मागणीप्रमाणे त्यांना कुशल मनुष्यबळ पुरविण्याच्या भूमिकेतून महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून कृती गटाची स्थापना करण्यात आली आहे. या कृती गटाच्या पुढाकारातून महाराष्ट्र आणि जर्मनीतील बाडेन- वुटेनबर्ग या औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्यात कुशल मनुष्यबळ पुरवण्याबाबत करार फेब्रुवारी २०२४ मध्ये करण्यात आला आहे. या कराराच्या अनुषंगाने सुकाणू समितीची बैठक जर्मनीतील स्टुटगार्ड येथे पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग नोंदवला. त्यावेळी ते बोलत होते. स्टुटगार्ड येथील या बैठकीत महाराष्ट्राचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्यासह बाडेन-वुटेनबर्गचे मुख्यमंत्री विनफ्रीड क्रेत्शमन, राज्याचे कुलपती डॉ फ्लोरिअन स्टेगमन, सामाजिक व्यवहार मंत्री मान्ने लुचा, शिक्षण मंत्री थेरेसा स्कॉपर, विज्ञान मंत्री पेट्रा ओल्शोव्स्की, आर्थिक व्यवहार मंत्री डॉ. निकोल हॉफमिस्टर-क्रॉट व इतर मान्यवर सहभागी झाले होते.यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, भारत आणि जर्मनी यांच्या मध्ये अनेक दशकांपासून द्विपक्षीय संबंध आहेत. महाराष्ट्र आणि वुटेनबर्ग मधील हा सामंजस्य करार या मजबूत भागिदारीचा पुरावा आहे. या करारामुळे जर्मनीतील मनुष्यबळाची समस्या सुटण्याबरोबरच महाराष्ट्रातील कुशल मनुष्यबळाला आंतरराष्ट्रीय अनुभव मिळण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.महाराष्ट्रातील तरुणांसाठी नवीन रोजगार



संधी निर्माण करण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल बाडेन-वुटेनबर्ग राज्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी आभार मानले. तसेच हा करार मानव संसाधन विकासातील आंतरराष्ट्रीय सहकार्याचे फायदे जगाला दाखवणारा असून हे इतर देशांसाठी एक मॉडेल ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. या बैठकीत महाराष्ट्रातील मनुष्यबळ आणि कौशल्य विकासाच्या योजनांविषयी तसेच बाडेन-वुटेनबर्ग राज्याच्या औद्योगिक विकासाविषयी सादरीकरण करण्यात आले.

# ना. रक्षाताई खडसे यांनी स्वीकारला केंद्रीय राज्यमंत्री पदाचा पदभार...

## भारताला स्पोर्टींग पॉवर हाऊस बनवणार !

**वृत्तसंस्था/रावेर**

रावेर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार श्रीमती रक्षाताई निखिल खडसे यांनी केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री म्हणून आज नवी दिल्लीत त्यांच्या मंत्रालयात पदभार स्वीकारला. आनंद आणि जबाबदारीच्या भावनेने मी राज्यमंत्री म्हणून क्रीडा मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारला. भूतकाळातील प्रभावी कामगिरीच्या आधारे भारताला एक स्पोर्टंग पॉवर हाऊस बनवण्याची अपेक्षा आहे, अशा भावना पदभार स्वीकारल्यानंतर रक्षाताईंनी व्यक्त केल्या.मला



ही जबाबदारी दिल्याबद्दल मी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे आभार मानते आणि केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीया यांनी आज पदभार स्वीकारल्याबद्दल मी माझ्या शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन करते.अशा भावना त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर व्यक्त केल्या.

# भगवान धन्वंतरीची विधीवत पुजा करून आयुष मंत्रालयांचा पदभार नामदार प्रतापराव जाधव यांनी स्विकारला...

**जनसंचलन/ बुलडाणा**

भगवान धन्वंतरीची विधीवत पुजा करून देशातील नागरीकांना निरोगी आरोग्य लाभु देव अशी धन्वतरी चरणी प्रार्थना करून भारताच्या आयुष मंत्रालयांचा पदभार नामदार प्रतापराव जाधव यांनी स्विकारला. दिल्ली येथील आयुष मंत्रालयात असलेल्या भगवान धन्वंतरी प्रतिमेची विधीवत पुजा नामदार प्रतापराव जाधव आणि राजश्री जाधव यांनी आज ११ जुन रोजी केली त्यांनतर आयुष मंत्रालयाचा पदभार नामदर प्रतापराव जाधव यांनी स्विकारला यावेळी आयुष मंत्रालयाचे सचिव वैदयराज कोटेचा संयुक्त सचिव भावना ससेन्सा उपस्थित होत्या. योगाच्या माध्यमातून निरोगी आयुष्यची देण मणुष्याला मिळल्याने योगाचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणात झाला आहे आज विदेशातील लोक सुद्धा निरोगी आयुष्यसाठी योग



साधना नियमित करता एवढ महत्व योगाला आहे भारतात योग, आयुर्वेदच्या माध्यमातून चांगल आणि गुणात्मक काम करणार असल्याच आयुष्य राज्यमंत्री ( स्वतंत्र प्रभार ) प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येणाऱ्या १०० दिवसाचं रोड मॅप करण्यात आला असून त्यामध्ये विकासात्मक दृष्टिकोनातून जनतेला सेवा देण्यात येणार आहे यामध्ये आयुष मंत्रालयाचे सुद्धा योगदान मोठ्या प्रमाणावर राहणार असून त्यासाठी आम्ही तयार असल्याची प्रतिक्रिया ही केंद्रीय आयुष राज्यमंत्री ( स्वतंत्र प्रभार )प्रतापराव जाधव यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले

# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सोसे व जायभाये यांनी दिला सामूहिक आत्मदहनाचा इशारा

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यामध्ये वादळी पावसासह गारपीट मोठ्या प्रमाणात झाल्याने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान व शेडनेटचे शंभर टक्के नुकसान होऊन शेतकऱ्याला न्याय मिळावा याकरीता बालाजी सोसे यांनी १८ मागण्या केल्या होत्या सिंदखेड राजा तहसील कार्यालयासमोर सहा दिवस आणि पळसखेड चक्का येथे चार दिवस अन्नत्याग आमरण उपोषण केले सोसे यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्याकरिता सर्व राजकीय पक्षातील नेतेमंडळींनी संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सिंदखेडराजा तहसील समोर जवळपास दहा हजार लोकांनी १४ डिसेंबर रोजी रस्तारोको केले श्री गजानन जायभाये यांनी गोंदण खेड तालुका देऊळगाव राजा येथे पिक विमा संदर्भामध्ये तीन दिवस अन्नत्याग आमरण उपोषण केले त्यावेळी उपजिल्हाधिकारी जिल्हा कृषी अधीक्षक माननीय तहसीलदार साहेब तालुका कृषी अधिकारी व जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांनी त्यांच्या उपोषण स्थळाला भेट दिली आणि श्री बालाजी सोसे यांचे पहिलं उपोषण सोडण्याचे आश्वासन कृषी मंत्री श्री धनंजय मुंडे यांनी फोन करून मदत देण्याचे दिले होते आश्वासन आणि डॉक्टर राजेंद्रजी शिंगणे साहेब यांनी सुद्धा उपोषण सोडते वेळेस आश्वासने दिली दुसरे उपोषण माननीय जिल्हा अधिकारी कार्यालय यांच्या मध्यस्थीने तहसीलदार साहेब सिंदखेड राजा तालुका कृषी अधिकारी साहेब, यांनी लेखी आश्वासन दिल्याने श्री बालाजी सोसे यांनी विनोद भाऊ वाघ यांच्या मध्यस्थीने उपोषण सोडले श्री गजानन जायभाये यांनी कपाशी पिक विमा संदर्भामध्ये शेतकऱ्याकडून नजरचुकीने स्टँडिंग क्रॉप ऐवजी हार्वेस्टिंग क्रॉप ऑनलाईन मध्ये नजरचुकीने चूक झाल्याने शेतकऱ्याचे अर्ज नाकारण्यात आले त्याकरिता व बागायती क्षेत्राची मदत मिळावी यासाठी व पिक विमा संदर्भामध्ये नाकारण्यात आलेल्या शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा देण्यात यावा याकरिता दोघांनी सुद्धा उपोषण करून लेखी आश्वासन देऊन सुद्धा आज पर्यंत कुठली मदत न मिळाल्याने दिनांक १८/ ६/ २०२४ रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालय सिंदखेडराजा येथे आत्मदहनाचा इशारा लेखी स्वरूपात दिला त्यामध्ये आम्हाला जर अटक केल्यास



आम्ही अटक त्या क्षणापासून अन्नत्याग आमरण उपोषण पुन्हा सुरू करू असे त्यामध्ये उल्लेख करण्यात आला आहे .त्यामुळे आता प्रशासन याकडे कशा पद्धतीने यांचे आंदोलन हाताळणार आहे व या भूमिकेकडे सर्वच शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे आणि या अगोदरच्या उपोषणाला हजारोच्या संख्येने शेतकऱ्यांनी व संपूर्ण राजकीय नेते मंडळींनी पाठिंबा दिला .त्यामुळे आता हे आंदोलन कशा पद्धतीने पुढे जात आहे याकडे संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.